भारतीय पोलीस सेवेतील अधिका-यांनी त्यांची वार्षिक अचल मालमत्ता विवरणपत्रे दिनांक ३१ जानेवारी, २०१६ पर्यत सादर करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन परिपत्रक क्रमांकः आयपीएस-४७१६/प्र.क्र.१०/पोल-१
गृह विभाग, २ रा मजला, मंत्रालय,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,मुंबई-४०००३२.
तारीख: ७ जानेवारी, २०१६

वाचा :- शासन परिपत्रक, गृह विभाग, क्र.आयपीएस-३७१४/प्र.क्र.५/पोल-१, दिनांक १७.०१.२०१५

प्रस्तावना :-

अखिल भारतीय सेवा (वर्तणूक) नियम १९६८ मधील नियम १६(२) नुसार अखिल भारतीय सेवेतील प्रत्येक सदस्याने दरवर्षी दिनांक १ जानेवारीची स्थिती दर्शविणारी अचल मालमत्ता विवरणपत्रे दिनांक ३१ जानेवारी पूर्वी सादर करणे आवश्यक आहे. त्यानुसार सन २०१६ या वर्षाची दिनांक ०१.०१.२०१६ ची स्थिती दर्शविणारी त्यांची वार्षिक अचल मालमत्ता विवरणपत्रे विहित कालावधीत सादर करण्यासंदर्भात या परिपत्रकान्वये सूचना देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

शासन परिपत्रक :-

अखिल भारतीय सेवा (वर्तणूक) नियम, १९६८ मधील नियम १६(२) नुसार महाराष्ट्र संवर्गातील भारतीय पोलीस सेवेतील अधिकाऱ्यांनी दरवर्षीप्रमाणे दिनांक ०१.०१.२०१६ ची स्थिती दर्शविणारी त्यांची वार्षिक अचल मालमत्ता विवरणपत्रे दिनांक ३१.०१.२०१६ पूर्वी खालील कार्यपध्दतीनुसार "IPS-II Section (Room No.219-A), North Block, New Delhi-1" येथे व us-ips2@mha.gov.in या ईमेलवर पाठविण्याची कार्यवाही करावी.

अ) दिनांक ०१.०१.२०१६ ची स्थिती दर्शविणारी सन २०१५ ची वार्षिक अचल मालमत्ता विवरणपत्र (Immovable Property Return) सोबत जोडलेल्या विहित नमुन्यात दिनांकीत स्वाक्षरीसह दोन प्रतीत, सीलबंद लिफाफ्यात गृह मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्याकडे दिनांक ३१.०१.२०१६ पर्यत सादर करावे.

ब) अचल मालमत्ता विवरण सीलबंद केलेल्या लिफाफ्यावर खालील बाबी स्पष्टपणे नमूद कराव्या.

i) Name and Designation of the Officer
ii) Allotment Year
iii) Year of Property Return (As on 01.01.2016)

क) भारतीय पोलीस सेवेतील अधिकाऱ्यांनी त्यांचे वार्षिक अचल मालमत्ता विवरणपत्र विहित कालावधीत सादर करणे ही बाब संबंधित अधिकाऱ्यांच्या दक्षता प्रमाणपत्राशी (Vigilance Clearance Certificate) निगडीत केलेली असल्याने कोणत्याही परिस्थितीत दिनांक ३१.०१.२०१६ पर्यत अचल मालमत्ता विवरणपत्र त्यावर स्वाक्षरी व दिनांक नमूद करुन वर नमूद पत्त्यावर पाठविण्यात यावा. तसेच यासंदर्भात केलेली कार्यवाही शासनास अवगत करावी.

सदर परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०१६०१०७११२८२९८२२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Charushila Chandrakant Tambekar

Digitally signed by Charushila Chandrakant Tambekar
DN: CN = Charushila Chandrakant Tambekar, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Joint Secretary
Date: 2016.01.08 12:17:15 +05'30'

(चारुशीला तांबेकर)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.मुख्य मंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. महासंचालक व पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
३. महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
४. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ मर्यादित, मुंबई.
५. महासमादेशक, गृहरक्षक दल व संचालक, नागरी संरक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
६. महासंचालक (न्यायिक व तांत्रिक), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
७. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ, मुंबई.
८. महाराष्ट्र संवर्गातील सर्व भापोसे अधिकारी (प्रतिनियुक्तीसह) (पोलीस महासंचालक, म.रा. मुंबई यांचे मार्फत)
९. अपर मुख्य सचिव (गृह) यांचे वरिष्ठ स्वीय सहाय्यक, गृह विभाग, २ रा मजला, मंत्रालय, मुंबई
१०.प्रधान सचिव (विशेष) यांचे वरिष्ठ स्वीय सहाय्यक, गृह विभाग, २ रा मजला, मंत्रालय, मुंबई
११.उप सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२.निवड नस्ती/पोल-१

STATEMENT OF IMMOVABLE PROPERTY RETURN FOR THE YEAR ____ AS ON __/__/____

1. Name of Officer (in full): ____ 3. Cadre & Batch: __________________

2. Service to which the Officer belongs: Indian Police Service 4. Present Pay: ______________

Name of District, Sub-Division, Taluka & Village or City in which property is situated (full location & postal address)	Name & Details of Property, Housing, Lands and Other Buildings	Cost of construction/ Acquirement (and year when purchased) including of land in case of house	Present Value *	If not in own name, state in whose name held & his/her relationship to the Govt. Servant	How acquired, whether by purchase, lease **,mortgage, inheritance, gift or otherwise with date of acquisition & name with details of person(s) from whom acquired.	Annual Income from property	Remarks
(1)	(2)	(3)	(4)	(5)	(6)	(7)	(8)

Signature:

Name:

Designation:

Date:

Note: Please read the notes overleaf before filling up the form.

NOTES

1) * In case where it is not possible to assess the value accurately, the approximate value in relation to present conditions may be indicated.

2) ** Includes short term leases also.

2) The declaration form is required to be filled in and submitted by every member of Class I and Class II services under relevant provisions of Conduct Rules and the first appointment to the Service and thereafter, at the interval of every twelve months, giving particulars of all immovable property owned, acquired or inherited by him or held by him on lease or mortgage, either in his own name or in the name of any member of his family or in the name of any other person dependent on Government Servant.

4) The wording ‘No Change or No Addition or As in previous year’ may be avoided and all details filled up.

5) AIS Officers are requested to fill the form in duplicate.